पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०९

**सभावृत्तांत**

दिनांक - **२०/१२/२०१९** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२०/१२/२०१९** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.अश्विनी भिमा बोबडे - सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.अनुराधा गणपत गोरखे
६. मा.उषा संजोग वाघेरे(पाटील)
७. मा.काळे उषा दिलीप
८. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) क्षेत्रीय कार्यालयांचे विकेंद्रीकरण करुन सक्षम करणेबाबत. – मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) मनपा इमारतींचे महात्मा ज्योतिबा फुले नाव दुरुस्ती करुन महात्मा जोतीराव फुले असे नावात बदल करणेबाबत. – मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) कामामध्ये स्थळ बदल करुन काम पूर्ण करणेबाबत.- मा.मनिषा पवार ,मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) श्री.संभाजी भगवान ऐवले,समाज विकास अधिकारी यांचे पदोन्नतीबाबत.- मा.मनिषा पवार , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्र.क्र.१८ मध्ये चापेकर चौकात पादचा-यांसाठी भूयारी मार्ग विकसित करणे विषयक कामे करणेसाठी मान्यता मिळणेबाबत. – मा.अनुराधा गोरखे , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

**----------**

दिनांक ०४/१०/२०१९,१८/१०/२०१९,०१/११/२०१९, १५/११/२०१९ व ६/१२/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २०/१२/२०१९

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ - मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

पिं.चिं.मनपाचे क्षेत्रिय स्तरावरील कामकाज आठ क्षेत्रिय कार्यालये स्थापन करुन चालविले जात आहे. क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येणारी विकास कामे तत्सम दुरुस्ती विषयक व नागरिकांचे जीवनमान राहणीमान आरोग्य उच्चदर्जाची सुविधा पुरविणे हे अपेक्षित धरुन केले जात आहे. क्षेत्रिय स्तरावर कामकाज हे यापुर्वी निर्गत झालेल्या अधिकार प्रदान आदेश/परिपत्रक यानुसार होत आहे. त्यामध्ये मर्यादेपर्यंतच्या कामांना/खर्चांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व सदर कामासाठी निविदा मागून अटीशर्ती निर्धारीत करुन स्वाक्षरी करणे करारनामा करणे व देयके अदा करणेचे अधिकार देण्यात आलेले आहे, त्यामुळे कामकाज करताना मर्यादा येत आहे. प्रत्यक्षात सद्यस्थितीचा विचार करता क्षेत्रिय कार्यालय सक्षम करण्यासाठी क्षेत्रिय अधिकार-याचे अधिकारात वाढ करणे हे अत्यंत गरजेचे असुन क्षेत्रिय स्तरावर प्रभावीपणे काम करण्यासाठी पुढील प्रमाणे अधिकारात वाढ करणे आवश्यक आहे.

**सर्व श्रेत्रिय अधिकारी**

१) र.रु.२५,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामाला/खर्चाला प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे संबंधी कार्यवाही करणे व संबंधित कामासाठी निविदा मागवुन अटीशर्ती निर्धारित करुन स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, कार्यादेश स्वाक्षांकित करुन निर्गमित करणे व देयके अदा करणे.

२) र.रु.४,००,०००/- मर्यादेपर्यंतच्या कार्यालय खर्चासाठी आवश्यक ती सामुग्री/सल्लागार खर्च/संगणक स्टेशनरी संगणक साहित्य (Hardware) विकत घेणे. कामाचे आदेश देणे व बिल मंजुर करणे.

३) कार्यालय कामाकाजासाठी र.रु.२५,०००/- स्थायी अग्रीमधन बिल मंजुर करणे.

४) वाहन इंधनासाठी र.रु.२५,०००/- मंजुर करणे.

**क्षेत्रिय अधिकारी सर्व क्षेत्रिय कार्यालय – आरोग्य**

१) र.रु.२५,००,०००/- कमाल मर्यादेपर्यंतच्या कामाला/खर्चाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. संबंधी कार्यवाही करणे व संबंधित कामासाठी निविदा मागवून अटीशर्ती निर्धारित करुन स्वाक्षरी करणे, करारनामा करणे, कार्यादेश स्वाक्षांकित करुन निर्गमित करणे व देयके अदा करणे.

२) र.रु.४,००,०००/- मर्यादेपर्यंतच्या कार्यालय खर्चासाठी आवश्यक ती सामुग्री/सल्लागार खर्च/संगणक स्टेशनरी संगणक साहित्य (Hardware) विकत घेणे. कामाचे आदेश देणे व बिल मंजुर करणे.

३) कार्यालय कामाकाजासाठी र.रु.२५,०००/- स्थायी अग्रीमधन बिल मंजुर करणे.

४) वाहन इंधनासाठी र.रु.२५,०००/- मंजुर करणे.

उपरोक्त प्रमाणे अधिकार प्रदान करुन क्षेत्रीय स्तरावरील क्षेत्रिय कार्यालयांचे विकेंद्रीकरण करुन सक्षम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २०/१२/२०१९

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ - मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहराच्या हद्दीतील आजपर्यंत विविध वास्तुंना म्हणजेच चौक, उद्याने, रस्ते, वस्ती व इतरत्र ठिकाणी नामनिर्देशक फलक करण्यात आले आहेत, तसेच उड्डाणपुल व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींना देण्यात आलेले " महात्मा ज्योतिबा फुले " हे नाव चुकीचे असुन त्यात दुरुस्ती करून " महात्मा जोतीराव फुले " हे योग्य व महाराष्ट्र शासनाच्या वतीने वापरात असलेले नाव देणेस. तसा अध्यादेश काढणेस आणि आजपासून संपुर्ण महानगरपालिकेच्या कामकाजात सुद्धा " महात्मा जोतीराव फुले " असा उल्लेख करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २०/१२/२०१९

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ - मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

ग क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.२४ मधील क्रांतीवीरनगर वर्धमान वाटीका सोसायटी समोरील रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये १२ मी रुंद घोषित करणेस ग प्रभाग समितीने अंतिम मान्यता दिली त्यानुसार जागेचा ताबा घेणेची प्रक्रिया सुरु करुन कामाची आवश्यकता लक्षात घेता तातडीने निविदा प्रक्रिया करुन प्रस्तावात नमूद कामाच्या निविदेचे आदेश दि.३१/०८/२०१८ रोजी प्राप्त झाले. मुळ निविदेत ४५५ मी लांबीच्या व १२ मी रुंदीचा रस्ता विकसीत करणेचे नियोजित होते. परंतु काही जागा मालकांनी जागेचा ताबा न दिल्याने ३८२ मी लांबीचा व ९ मी रुंदीचा रस्ता विकसीत करणेत आला. सद्यस्थितीत २.४० कोटी निविदा रक्कमेपैकी १ कोटी रुपये इतका खर्च झाला असुन १.४० कोटी रक्कमेचे काम शिल्लक आहे. सदर ठिकाणी जागेचा ताबा अद्यापही न मिळाल्याने उर्वरीत काम पुर्ण करणे सध्यातरी शक्य नाही. प्रभाग क्र.२४ मधील वाकड पोलीस स्टेशनला लागुन पोलीस लाईन कडे जाणा-या ९०० मी लांबीचा व ९ मी रुंदीचा रस्ता सद्यस्थितीत अरुंद असुन विविध वाहिन्या टाकणेकरीता खोदण्यात आलेला असून सदर रस्ता तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. सबब सदरचे काम प्रस्तावात नमूद कामाच्या शिल्लक रकमेतुन करणे शक्य आहे. तरी प्रस्तावात नमुद कामाच्या स्थळामध्ये बदल करुन कामाच्या बचतीमधुन प्रभाग क्र.२४ मधील वाकड पोलीस स्टेशनला लागुन पोलीस लाईनकडे जाणा-या ९०० मी लांबीचा व ९ मी रुंदीचा रस्ता हॉटमिक्स पद्धतीने विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २०/१२/२०१९

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ - मा.मनिषा पवार, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण – 2016/प्र.क्र.43/16 नवि-28 दि. 14 नोव्हेंबर 2017 नुसार प्रत्येक महानगरपालिकेने दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेतील एका उप - आयुक्तांवर सोपवावी व याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी. तसेच शासन निदेशाचे तत्परतेने व काटेकोरपणे पालन होईल, या दृष्टीने संबंधितांनी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी असे सर्व महानगरपालिका आयुक्त यांना लेखी कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन विभागाकडील सहाय्यक आयुक्त यांचे पत्र क्र./प्रशा/07/कावि/449/2019 दि.25.06.2019 चे पत्रानुसार दि.30 जुलै 2016 अन्वये मा.शासनास पाठविण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम 2016 व आकृतीबंध यामध्ये एकूण 08 उपायुक्त अभिनामाची पदे निर्माण करणेत आलेली आहेत. त्यापैकी समाज विकास विभागासाठी 01 उपायुक्त नवीन पदाचा समावेश आहे. सदरचे सेवा प्रवेश नियम व आकृतीबंध हे अंतिम मान्यतेकामी शासन स्तरावर प्रलंबित आहेत. दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणा-या संघटनांनी सुद्धा या शासन निर्णयाची त्वरीत अंमलबजावणी करुन दिव्यांग व्यक्तींच्या योजनांसाठी स्वतंत्र कक्ष आणि स्वतंत्र अधिकारी यांची नियुक्ती करावी अशी मागणी केली आहे. दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याच्या दृष्टीने श्री.संभाजी भगवान ऐवले हे समाज विकास अधिकारी गट-ब या पदावर दि.22.08.2014 पासून नागरवस्ती विकास योजना विभागात कार्यरत आहेत. याच विभागात त्यांची 21 वर्षे सेवा झालेली आहे. तसेच महापालिकेत एकूण 33 वर्षे सेवा पूर्ण झाली आहे. त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता व सेवानिवृत्ती दिनांक 31.05.2021 या सर्व बाबी विचारात घेता, तसेच आदेश क्र.लेखा/1अ/कावि/796/2019 दि.29.06.2019 चे आदेशान्वये समाज विकास अधिकारी या पदाचे वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करणेत आलेली आहे. या पदास सुधारीत वेतनश्रेणी र.रु.9300 – 34800 ग्रेड पे 5400 लागू करणेत आलेली आहे. समाज विकास अधिकारी हे पद प्रशासन अधिकारी समकक्ष आहे. श्री.ऐवले हे एकमेव सहाय्यक आयुक्त या पदाकरिता निर्धारीत करण्यात आलेली अर्हता धारण करीत आहेत. त्यामुळे त्यांचेकडे दिव्यांग बांधवांचे विषय हाताळण्याची जबाबदारी सोपविण्यात यावी. वेतनश्रेणी रक्कम रुपये 15600 – 39100 ग्रेडपे 6600 सहाय्यक आयुक्त या पदावर श्री.ऐवले यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 45(4) मधील तरतुदीनुसार मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास यांचेकडील दि.14 नोव्हेंबर 2017 चे परिपत्रकानुसार पदोन्नती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सदर ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २०/१२/२०१९

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भ - मा.अनुराधा गोरखे, मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

प्र.क्र.१८ मधील तानाजी नगर परिसर, पवनानगर, रस्टन कॉलनी परिसरात रोड कॉंक्रीटिकरणांचे स्थापत्य विषयक कामे चालु आहे. सदरचे कामात म.रा.वि.वि.कं.लि. व म.न.पा.

विद्युत साहित्यांचा सदरचे कामात अडथळा होत आहे. सदर अडथळा करणा-या विद्युत साहित्यांचे स्थलांतरण व विद्युत विषयक कामकाज करणेसाठी विद्युत विभागाकडे तरतुद उपलब्ध नसलेने विद्युत विषयक कामकाज काढणेत आले नाही. त्यामुळे सदर कॉक्रेटीकरणांची कामे थांबलेली आहेत. तसेच प्र.क्र.१८ मध्ये चापेकर चौकात पादचा-यांसाठी भुयारी मार्ग विकसित करणे अंतर्गत विद्युत विषयक कामाची निविदा क्र.२७/२-२०१८/१९ निविदा रक्कम रुपये १,४०,२६,२०५/- (१२.२२**%** कमी) काढणेत आले आहे. सदर ठिकाणचे पादचा-यांसाठी भुयारी मार्ग विकसित करणेचे स्थापत्य विभागाचे काम रद्द करणेत आले आहे. प्र.क्र.१८ मध्ये खालील नमुद स्थापत्य विषयक कामे चालु आहेत.

१) प्रभाग क्र.१८ मधील केशवनगर तानाजी नगर भागातील अंतर्गत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

२) प्र.क्र.१८ मधील केशवनगर, पवनानगर भागातील अंतर्गत रस्त्यांचे कॉक्रिटीकरण करणे.

३) रस्टन कॉलनी अंतर्गत रस्त्यांचे यु.टी.डब्ल्यु.टी. पद्धतीने कॉक्रिटीकरण करणे.

उपरोक्त कामा मधील म.रा.वि.वि.कं.लि.चे उपसकर तारा असलेले अडथळ्याचे खांब व रस्त्याच्या कामात येणा-या व्यक्तीगत केबल हलविणे तसेच म.न.पा. विद्युत साहित्यांचा अडथळा दुर करणेसाठी निविदा क्र.२७/२-२०१८/१९ चे कामातुन सदरचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५६८/२०१९
दिनांक : २०/१२/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.